# बाबांनी हट्ट पुरविला

—श्री. ए. बी. पटवर्धन
जोसेफ व्हिला, नंदादीप कॉलनी
जयप्रकाश रोड, नं. ५ गोरेगाव (पूर्व) मुंबई ६३.

● सन १९७२ चे जून महिन्यातील गोष्ट. नेहमीचे शिरस्त्याप्रमाणे समाधि-मंदिरातील काकड आरती झाल्यावर मी द्वारकामाईत श्रीबाबांचे प्रतिमेसमोर नामस्मरण करीत होतो. इतक्यात एक सुमारे ३५–४० वर्षे वयाचा संन्यासी तेथे आला बाबांचे फोटोजवळ जाऊन जणु काही बाबाच प्रत्यक्ष बसले आहेत अशा तऱ्हेने त्यांचेशी हितगूज तो करू लागला. मी काही न बोलता नुसता पहात होतो. थोड्या वेळाने त्या संन्याशाने मागे वळून पाहिले, तो मी तेथे उभा असलेला पाहून तो माझ्या जवळ आला, आणि प्रेमळ आवाजात मला म्हणाला 'आप ऐसा मत समजो के ये बाबाकी तस्वीर है! बाबा साक्षात वहाँ बैठे है ! प्रेमसे पुकारोगे तो वे आपसेभी बात करेंगे !' हे त्याचे उद्‌गार ऐकल्यावर माझे कुतूहल चांगलेच जागृत झाले व त्याला आलेल्या बाबांचे अनुभवाबद्दल मी त्याला विचारले. त्यावर तो म्हणाला, 'माझे नाव गाव किंवा इतर माहिती मी सांगणार नाही. मला असंख्य अनुभव आले आहेत. वास्तविक आम्ही लोकांनी दुसऱ्याला सांगू नये, पण बाबांचे प्रेरणेनेच एक अद्वितीय अनुभव तुम्हाला सांगतो. बाबांचे कृपेने खिशात दमडी नसताना सुद्धा चारीधाम यात्रा व हिमालयात परिभ्रमण झाले तेव्हाची गोष्ट. एके दिवशी माझे मनात असे आले की, हिमालयाचे परिसरात अनेक महात्म्यांचा संचार असतो, त्याप्रमाणे बाबांचाही असेल, आणि असला तर त्यांचे साक्षात् दर्शन आपल्याला का घडू नये? म्हणून मी त्याच क्षणी असा निश्चय केला की एकांतात बसून श्रीबाबांना आव्हान करावयाचे. तेव्हा असे पण ठरविले की दुसरे दिवशी सकाळी ९ वाजेपर्यंत सतत धावा चालू ठेवायचा. तोपर्यंत दर्शन न झाले तर सरळ जाऊन आत्मघात करावयाचा व यासाठी एक जागा पण पाहून ठेवली. ती अशी की शरीर झोकून दिल्यावर चिंधड्याच उडाव्यात. स्वस्थानी येऊन सतत धावा चालू केला. दुसरे दिवशी सकाळी नऊचा सुमार झाला. मनात निराशा दाटू लागली. आपले जिणे व्यर्थ ठरले असे वाटून शेवटची एक निर्वाणीची हाक देऊन उठावे व शरीर झोकून द्यावे असे ठरविले, आणि त्याप्रमाणे कळवळून हाक मारली व उठणार इतक्यात 'क्या कहू बेटे! बाबा साक्षात् मेरे सामने खडे हुवे हे सांगताना त्याचे डोळे भरुन आले. माझेही अंगावर रोमांच येऊन डोळ्यातून प्रेमाश्रू वाहू लागले 'बस यापुढे काही सांगणार नाही' असे म्हणून तो संन्यासी ध्यानस्थ झाला. त्याचा मुक्काम द्वारकामाईतच होता व शिरडी सोडताना मी त्याला भेटलो तेव्हा 'बाबांची मर्जी असेल तर पुन्हा आपली भेट होईलच असे तो म्हणाला व त्याने आशीर्वाद दिला. ●

# बाबांचे अनुभव

-- यशवंत म्हसळकर
गुरुप्रेरणा, नाईकवाडी, ठाणे २.

● श्री साईकृपेचे लहान मोठे अनेक अनुभव १९५२ ते आजतागायत मला आले आहेत. त्यातील काही ठळक अनुभवच खाली देत आहे.

१) मी साईबाबांचे नाव साधारण १९४५ साली ऐकले परंतु त्यांच्या दर्शनाचा योग १९५२ साली आला. मी १९४९ साली न्युमोनियाने आजारी पडलो. माझ्या वडील बहिणीने साईबाबांची प्रार्थना केली की, ' माझ्या भावाला या आजारपणातून बरे करा म्हणजे मी त्याला तुमचे दर्शनाला शिरडीस पाठवीन. मी बरा झालो माझी बहीण मला शिरडीस जाऊन येण्यास वारंवार सांगू लागली. मी काही महिने लक्ष दिले नाही. पण १९५२ च्या जानेवारीत ऑफिसमधील एक स्नेही शिरडीस जाण्यास निघाला. त्याचेबरोबर मी व माझा १०।१२ वर्षाचा मोठा मुलगा-तो पण मलेरियाच्या तापाने वारंवार सिक पडत असे. परंतु साईकृपेने पूर्ण बरा झाला होता- शिरडीस साईच्या दर्शनाला गेलो. दोन दिवसांच्या मुक्कामात समाधी मंदीर द्वारकामाई व येथील वातावरणाने मोहून गेलो. जरा डोळा लागला की फुलाच्छादित समाधीचे दर्शन होई. अतृप्त मनाने शिरडी सोडली. समाधीची तसबीर आणली होती. त्याची देवपूजेत पूजा आरती सुरू केली.

परत पंधरा दिवसांनी एका पुतण्याला घेवून शिरडीस गेलो. सर्व आरत्यांना हजर राहिलो. रजा नव्हती म्हणून परत निघालो. मनमाड स्टेशनवर गाडी आली, पण कोणत्याच डब्यात पाय ठेवण्यास रिघ मिळेना. एक मिलिटरीचा डबा साधारण रिकामा होता, पण दरवाजात उभे असलेले सैनिक सर्वांना मज्जाव करीत होते. सर्व डब्यांवर परत एक नजर मारली. साईबाबांची मनात प्रार्थना केली. आवडीने दर्शनाला आलो, पण कामावर रुजू होण्यास जाता येऊ नये, असे का ? निराशेने मागे फिरत असताना त्या मिलिटरी डब्यातील दरवाजावरील सैनिकांनी आम्हा दोघांना बोलावून आत घेतले. झोपण्यास जागा करून दिली. ज्या गाडीने उभ्यानेसुद्धा प्रवास करणे अशक्य होते त्याच गाडीतून आम्ही झोपून दादरपर्यंत प्रवास केला.

ऑफीसमध्ये थोड्याच दिवसात मला प्रमोशन मिळाले. उल्लेख करण्यासारखी गोष्ट म्हणजे १९५० साली मला वेस्टर्न रेल्वे, जनरल मॅनेजरच्या सेक्रेटरीच्या सहीची एक ऑर्डर मिळाली. त्यात नमूद केले होते, साधारण एक वर्षापूर्वी माझा पगार चुकीने जास्त ठरविला गेला, त्याची ५००/६०० रुपयांची बाकी मजकडून वसूल केली जाईल व पगार पण ४५-५० रुपयाने कमी केला जाईल. माझा काहीच दोष नव्हता म्हणून

क्रेटरीला अपील केले पण उपयोग झाला नाही. योगायोग म्हणजे मला प्रमोशन मिळाले त्याचे पहिले ४७ दिवस याच सेक्रेटरीकडे काम करण्याची संधी मिळाली. ४७ दिवस पूर्ण झाल्यावर त्याने माझ्या कामाची ज्या साहेबाकडे नंतर काम करण्यास जाणार होतो त्याचेकडे रवानगी केली. मला पण कधीही अडचण पडल्यास त्याला भेटावे असे सांगितले. मी थोडक्यात माहिती त्याला सांगितली. त्याने लेखी अपील करण्यास मला सुचविले. मी पूर्वीच्या अपिलाचा उल्लेख न करता नवीन अपील केले. थोडक्याच दिवसात त्याच सेक्रेटरीच्या सहीची ऑर्डर निघून माझ्याकडून अशी बाकी वसूल करू नये येवढेच नव्हे तर माझा पगार कमी पण करता येणार नाही. कमी केलेल्या पगाराची सर्व १५/१६ महिन्याची बाकी मला द्यावी. म्हणजे मला जे साधारण ६०० रुपये भरावे लागणार होते त्याऐवजी मलाच ८०० रु. मिळाले.

मी समाधीच्या फोटोची पूजा करताना श्रीसाईसुमनांजलीमधील १०८ नावे म्हणत असे. एके रात्री साईबाबांनी स्वप्नात सांगितले की, 'फक्त नावे न घेता प्रत्येक नावाबरोबर एक तुळशीचे पान वाहावे तुझे कल्याण होईल.' मी ऑफीस कामासाठी १५।२० दिवस सुद्धा महिन्यातून बाहेरगावी असे. रोज तुळशी वाहणे शक्य होणार नाही. म्हणून दर गुरुवारी साई पादुकांवर १०८ तुळशी वाहतो. माझा मोठा भाऊ मात्र हे समजल्यापासून रोज १०८ पाने वाहतो. त्याची स्थिती चांगली सुधारली आहे.

कृतांताच्या दाढेतून काढीन निजभक्ता ओढून—माझे १९५९ साली साधेसे ऑपरेशन झाले होते. एका रात्रीत तब्येत एकाएकी बिघडली. पायाकडून शरीर गार पडू लागले. हालचाल करता येईना. बेचैन होऊ लागलो. विश्वास ठेवा अगर नठेवा माझ्या पलंगाच्या चार कोप-यावर चार काळपुरुष गळ्यात दोरखंड अडकविलेले उभे राहिले. जिभेला कोरड पडली, पण मुखाने साईनाम चालू होते. त्यातील एक पुरुष दुसऱ्याना सांगत होता, "तुम्ही कोणीतरी याला प्रथम हात लावा, माझ्याने हात लावणे होणार नाही." मी सर्वशक्तीनिशी साईबाबांना हाक मारली व म्हणालो, 'हे पहा मला त्रास देत आहेत.' त्या बरोबर चौघेही तेथून नाहीसे झाले. माझ्या शरीरात उष्णता येऊ लागली. मी पूर्ण बरा झालो.

●

# बाबांनी रक्षण केले

– सौ. मंदा मनुभाई शहा
राममंदिरसमोर, मु. नवापूर, धुळे

● १९७० मध्ये माझ्या प्रथम प्रसुतीच्यावेळी डयू तारीख पालटून काही दिवस वर गेले तरीपण काहीच चिन्ह दिसेना, तेव्हा आम्हाला समजले की प्रसूति नॉर्मल होणार नाही. सुरक्षितेसाठी प्रसूति शहरात करण्याचे ठरवून आम्ही कल्याणला गेलो. एका मित्राच्या घरी मला ठेवून माझे मिस्टर दोन दिवसासाठी घरी नवापूरला गेले. ते ज्या दिवशी दुपारी जाययास निघाले त्याच दिवशी रात्री मला वेदना सुरू झाल्या. समोरच असलेल्या प्रसूतिगृहात मला दाखल केले. त्या सबंध रात्री व दुसरा सबंध दिवस खूपच त्रास होऊनसुद्धा प्रसूति झाली नाही, तेव्हा तिकडचे डॉ. म्हणाले, ‘ इथे प्रसूति होणार नाही यांना तुम्ही हॉस्पिटलमध्ये घेऊन जा. ’ मला संध्याकाळी सातला सर्जिकल हॉस्पिटलमधे पोहचवली. माझी हालत खुपच नाजूक झाली होती. जवळ स्वतःचे मनुष्य कोणीच नव्हते म्हणून मी खूपच घाबरले होते. मला तपासून डॉ. लगेच म्हणाले, ‘ प्रसूति नॉर्मल होणार नाही, ताबडतोब ऑपरेशन करावे लागेल. ’ लगेच मला ऑपरेशन थेअटरमधे नेले. टेबलावर घेतले तेव्हा ‘ माझं काय होईल ’ या विचारांनी मन खूपच बेचैन झाले. ‘ काही बरे वाईट झाले तर माझी आणि त्यांची शेवटची भेट पण होणार नाही ’ असे विचार येऊन खूपच भीति वाटत होती. मनात सारखा साईबाबांच्या नावाचा जप चालूच होता. इतक्यात माझे लक्ष समोर एका उंच टेबलावर ठेवलेल्या साईबाबांच्या मूर्तीकडे गेले. मूर्तीचा चेहरा माझ्या समोरच होता व डोळे माझ्यावर खिळले होते. चेहऱ्यावर शांत व गोड हास्य होते. मला तर वाटले स्वतः साईबाबा माझ्या समोर येऊन माझी काळजी घ्यायला बसले आहेत. जणू मला आश्वासन देत आहेत की, “ घाबरतेस कशाला ? मी इथे आल्यावर कसली भिति? आणि कोणाची काय गरज आहे.! सगळं नीट होईल. काहीच काळजी करू नकोस.” माझी भीति लगेच पळाली व मन शांत झाले. नंतर ऑपरेशन पण सफल झाले. मी जेव्हा शुद्धिवर आले तेव्हा डॉक्टरांचे शब्द ऐकू आले. “ मिसेस शाह आता तुम्ही ठीक आहात काळजी करण्यासारखे आता काही नाही. देवांनी तुम्हाला मस्त गुंड्या दिला आहे. ” बाळ बघून खूपच समाधान वाटले. बाबांनी ह्या प्रसंगी माझी जी रक्षा केली त्याचे वर्णन करण्यासाठी खरोखर आम्ही असमर्थ आहोत. ●

# स्वप्न आणि पार्सल

– माधव गोरे,
विनायकभुवन, बालाजी मंदिर मार्ग, कुर्ला मुं. ७०

● २३ जुलै १९७१ रोजी सकाळी मला उठता उठता स्वप्न पडलेः " माझ्या दारी पोस्टमन आला व माझ्या हातात ४ कागदी पिशव्यांची पार्सले दिली. मी पार्सले उघडून बघितली तर प्रत्येकामध्ये बाबांची दगडावर बसलेली मूर्ती होती. त्यापैकी २ मूर्ती शाडूच्या व २ मूर्ती पंचधातूच्या होत्या व नंतर १५ दिवसांनी म्हणजे ६ ऑगस्ट रोजी माझे खडकपूरचे एक मित्र श्री टि. आर. नायडू ( हे सुद्धा एक महान साईभक्त आहेत. ) त्यांनी मला एक पंचधातूची मूर्ती पार्सलने पाठविली. अचानक काही माहिती नसताना पार्सल आले ह्याबद्दल मी चाटच पडलो व उघडून पहातो तर त्यात बाबांची दगडावर बसलेली पंचधातूची मूर्ती. ती मूर्ती हाती पडल्याबरोबर मला वरील स्वप्नाचा अर्थ उलगडून आला, व नंतर लगेच वामन द्वादशीला त्या " वामन मूर्ती " मी पूजेस स्थापना केली. ●

# साईचे चमत्कार अगाध

– वसंत फरतोडे,
खार, मुंबई

● श्री सच्चिदानंद सत्गुरू साईबाबांच्या अनंत कोटी परब्रह्म स्वरूपाविषयी लिहिण्यास माझे सामान्य विचार कितपत योग्य ठरतील. याचा निर्णय मी माझ्या साईप्रेमी बंधुभगिनीवरच सोपवितो.

श्री साईबाबांनी आपल्या भक्तांना पूर्वीच सांगितले होते की, जो जो मज भजे ।। जैसा जैसा भावे। तैसा तैसा पावे मीही त्यांसी ।। बाबांच्या चमत्कारापेक्षा, सेवेला, भक्तीला अधिक किंमतदेतात. देव, भक्तांना दर्शन देण्याकरीता सदोदितच हजर असतात.

मी श्रीसाईबाबांची सेवा जवळ जवळ ८–१० वर्षांपासून करितो. मला बाबांचे बरेच अनुभव आहेत. त्यात देव भक्तांना कशा प्रकारे दर्शन देऊन त्यांची इच्छा पूर्ण करतात, ते मी खाली देत आहे.

आमचे घरचे सर्व लोक एकदा दसऱ्याला शिर्डीला गेले होते. तेथे आम्ही अभिषेक करण्यास बसलो. आमचा नंबर फारच मागे होता. तेवढ्यात एक मनुष्य बाबांचे समोर आपला नवस फेडीत होता. त्याने आपल्या मुलाला एका पारड्यात ठेवले व दुसऱ्या पारड्यात पेढे ठेवले होते. हे आम्ही सर्वच पाहात होतो व त्याच वेळी मीसुद्धा बाबांना म्हणालो की, मला जर मुलगा झाला तर मी सुद्धा असाच चांदीच्या विटांनी नवस देईन हे वाक्य मी त्याच दिवशी बोललो होतो. पुढे बाबांचे कृपेने मला मुलगा झाला, पण त्या मुलाच्या जन्माची वेळ म्हणजे फारच कठीण काळ होता. पण बाबांचे कृपेने मुलाची आई व मुलगा दोन्ही सुरक्षित होते. त्यांना कसल्याही प्रकारे दुःख झाले नव्हते, आणि मी सुद्धा फारच अडचणीत होतो. पण बाबांची केवढी लीला अगाध आहे, की बाबांच्या रूपात येऊन मला एकाने मदत केली, आणि आता बाबांचे कृपेने मुलगा मोठा वाढत आहे.

त्या नंतर मी काही कामाकरिता इंदौरला गेलो होतो. माझे इंदौरचे काम वगैरे करून मी इंदौर ते अमरावती बसने इंदौरवरून अमरावतीला येण्यास निघालो. पुढे तीच बस दर्यापूर या गावाला थांबली. ते दिवस पावसाळ्याचे होते. वेळ साधारण संध्याकाळची होती. संध्याकाळचे साधारण ५ वाजले होते. बस दर्यापूर स्टँडवरून निघाली. जवळ जवळ४–५ मैलावर एक लहान नदी लागली. नदीला पाणी साधारण होते. ढग एकाएकी भरून आले. विजा चमकू लागल्या. काळोख पडला होता. आमची बस वेगाने जात होती. तेवढ्यात एकाएकी बस नदीच्या काठा वरून खाली घसरली, पण अर्धवट उलटी झाली, पूर्ण बस उलटली नव्हती. बऱ्याच लोकांना थोडा मार लागला. बसमधून सर्व लोकांना उतरवून दुसऱ्या बसमध्ये बसवून दिले, ही सर्व बाबांची कृपा होय. त्यामुळे आम्हाला कशाही प्रकारे दुःख झाले नाही. बसमधले प्रत्येक प्रवासी व्यवस्थीतपणे अमरावती या गावी सुखरूप पोचले.

बाबा मझ्यावर फारच कृपेची छाया ठेवीत आहेत. बाबांची प्रत्येक भक्ताने श्रद्धेने व निष्ठेने पूजा केली तर बाबा त्या भक्ताला कुठल्याही संकटातून वाचविल्याशिवाय राहणार नाहीत. आतापर्यंत कुठलाही भक्त बाबांच्या चरणाशी आला तर बाबांनी त्याला सहारा दिलाच. स्वतः बाबांनी म्हटले आहे की–

॥ शरण मज आला आणी वाया गेला ॥
॥ दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥

बाबांनी म्हटल्याप्रमाणे खरोखरच बाबांचे वाक्य अगदी खरे आहे. बाबांच्या चरणाशी आलेले अनेक भक्त आपल्या अनेक दुःखातून, संकटातून दूर झालेले आढळतील. कित्येक भक्त बाबांना आपआपले निरनिराळ्या मागण्या घालीत असतात.

निरनिराळे दुःख सांगत असतात. बाबा त्यांचे मागणे व दुःख निवारत असतात. बाबा त्यांचे केवढे कृपावंत आहेत, हे आपण अनुभव घेऊन पहावे. मला तर असे वाटते की असा कोणीही जगाच्या पाठीवर नसेल की त्याने श्रद्धापूर्वक अंतःकरणाने बाबांना हाक मारली व – – बाबा धावून आले नाहीत. बाबा भक्ताच्या हाकेला किती लवकर धावतात, याचे हे सुंदर उदाहरण आहे.

आजच्या जगात देव दिसत नाही, पण माझ्यामते हे खोटे आहे ! बाबा अनेकांना दिसतात, पावतात, त्यांचे संकट दूर करतात. असा एकही भक्त मिळणार नाही की भक्ताने हाक मारली किंवा न मारली तरी बाबा भक्तांचे संकट ओळखून त्याची सुटका करण्यास तेथे हजर असतात. मग आजच्या जगात देव नाही का ? फक्त प्रत्येक भक्ताने तेवढी श्रद्धा व निष्ठा ठेवली म्हणजे झाले. मग बाबा आपले हाकेला धावून येतात कि नाही ते पहा. जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव.

जो ज्या ज्या प्रकारे भक्ती करील त्या त्या प्रकारे बाबा भक्तांना अनुभव व प्रचिती दाखवतात.

मला तर अगदी सारखे वाटत असते कि बाबा आपल्या भक्तासाठी आपले बोल खरे करून दाखविण्यासाठी भक्तांच्या रक्षणार्थ त्या समाधीमधून पण धावत येतात. पण त्या भक्ताने अतिशय श्रध्देने स्मरण करावे.

ज्या प्रमाणे बाबांनी माझे रक्षण केले तसेच संकटसमयी ते आपल्या सर्वांचे रक्षण करोत व त्यांची कृपादृष्टी आपल्या सर्वांवर राहो ! हीच श्रीसाई चरणी प्रार्थना आहे.

# श्रीसाईकृपेचा एक अनुभव

– शशिकांत नाईक,
' आशिर्वाद ' बांद्रा.

● ठाण्याचे परम - पूज्य श्री. गजानन महाराज आम्ही त्यांना साई-तुल्यच समजतो व त्यांचीच कृपा म्हणून मी शिर्डीला लहान असल्यापासून जातो. जवळ-जवळ गेली २५ वर्षांपासून सप्ताह पण झाले आहेत परंतु दृष्टांत झाला नव्हता.

महाराजांकडे जायला लागल्यानंतर मी परत सप्ताहासाठी एकोणीसशे पंचाहत्तर साली शिर्डीलाच गेलो व परत आल्यावर मला पुष्कळ जण म्हणाले, " कायरे ! तुला काही दृष्टांत झाला का ?" मला आनंद पुष्कळ मिळाला होता, परंतु दृष्टांताबद्दल खटकत असे, परंतु महाराजांच्या कृपेने ही इच्छासुध्दा पूर्ण झाली.

मी महाराजांकडे जाण्यासाठी वेळ आहे, असे बघून श्रीसाईबाबांच्या फोटोला नमस्कार करून जरा लवंडलो. माझा जरा डोळा लागला व स्वप्न पडले. त्या मध्ये मी (रस्त्याच्या बाजूलाच असलेल्या खोलीत) श्रीसाईबाबांच्या मूर्तीला (समाधी मंदीरात आहे तशी) नमस्कार करत होतो, व एक सवाशीण बाई व लहान ७-८ वर्षांची असलेली मुलगी; बाबांना कुंकू वगैरे लावत होती. श्रीबाबांनी पायावरचा हात हालवला. मी म्हणालो, "काही कळले नाही," तेव्हा श्रीबाबांनी हातानी "अच्छा है!" म्हणून सांगितले व मला जाग आली. नंतर मी श्रीमहाराजांकडे गेलो. मी गेल्याबरोबर महाराज जोरात हसायला लागले व म्हणाले, (दुसऱ्यांशी बोलण्याच्या संदर्भात) "कायरे तुला कोणाचा फोन आला होता दुपारी?" मी मनात म्हणालो, महाराजांना आपल्या दृष्टांताबद्दल इतर गोष्टीप्रमाणे आधीच समजले आहे व मला खात्रीच आहे की परम-पूज्य श्री गजानन महाराजामुळेच मला हा श्री साईबाबांचा दृष्टांत झाला होता. ●

## —श्रद्धा—

– सौ. सरला सू. गर्जे.
पुणे–३०.

● श्रद्धा ही एक बलाढ्य शक्ति आहे की, जिच्या द्वारे मनुष्य अशक्य गोष्टी देखील शक्य करून दाखवू शकतो.

साईबाबा म्हणतात,

नवसास माझी पावेल समाधी, धरा दृढ बुद्धि माझे ठाई ॥ ... ...

श्रद्धा व भक्ति या दोन पंखाद्वारे मनुष्य परमार्थात भराऱ्या मारू शकतो.

आमचा साईनाथांवर दृढ विश्वास आहे. कुठलेही संकट आले तरी मी साईबाबांचा धावा करते. त्यामुळे संकट टळते. दोन महिन्यांपूर्वीची गोष्ट. एअरफोर्समध्ये हे इंजिनिअर आहेत. त्यामुळे एअरफोर्समध्ये दोन महिन्यापूर्वीच क्वार्टर मिळाले. म्हणून आम्ही सर्वजण शिवाजी नगरहून इथे राहण्यास आलो. आमची मुले पूर्वी खडकीच्या सेंटर स्कूलमध्ये जायची. आता एअरफोर्सच्या सेंटर स्कूल जवळ क्वार्टर मिळाल्यामुळे या शाळेत घातले, घातले खरे, परंतु त्या घालण्यासाठी कोण धडपड करावी लागली!

प्रथम तर शाळेच्या प्रिन्सीपॉलनी संपूर्ण नकार दिला. त्यांचे म्हणणे असे की मुलांच्या गर्दीमुळे आम्ही आता मुलांना अजिबात प्रवेश बंद केला आहे. फक्त

परगावच्या मुलांना नाईलाजाने प्रवेश द्यावा लागतो. गावातल्या गावात झालेली बदलीची मुले आम्ही मुळीच घेत नाही.

क्वार्टरमध्ये येऊन बसलो. पण इथून पुन्हा खडकीला एका बसऐवजी डबल बस करून पाठवायचे या विचाराने डोके सुन्न झाले. नैराश्याची छटा पसरली. बाबांशिवाय दुसरा काहीच आधार दिसेना.

आम्ही दोघानी हा संपूर्ण गुरुवार उपोषणात घालवायचा व बाबांवर सर्व भार सोपवायचा असे ठरविले. माझी छोटी मुलेही निराश होऊन त्या दिवशी उपाशीच राहिली अन् काय चमत्कार! दुसऱ्या दिवशी त्यांचे मोठे साहेब स्वतः 'यांना' घेऊन प्रिन्सीपॉलांकडे गेले, आणि त्याच दिवशी अचानक दिल्लीहून 'शिक्षणाधिकारी, काही कामानिमित्त शाळेत आले होते. 'यांनी' आपली संपूर्ण कल्पना देऊन माझ्या छोट्या मुलांना या शाळेत प्रवेश द्यावा अशी विनंती केली आणि बाबांच्या रूपाने जणू धावत आलेल्या शिक्षणाधिकाऱ्यांनी संमतीही दिली व प्रिन्सीपॉलना मुलांना शाळेत प्रवेश देण्यास सांगितले.

पंधरा दिवस नैराश्येच्या अंधःकारात तळमळणाऱ्या मनाला हा आशेचा किरण दाखविला तो साईनाथांनीच.

या अनंतकोटी ब्रह्मांडनायकाशिवाय अशी अगम्य लीला कोण करणार!

●

# बाबा माझ्याकडे दिवाळीला येतातच

– लीलाताई गोलतकर
हिरजी गोविंदजी चाळ, नवा नागपाडा,
भायखळा, मुंबई ८.

● १९५२ सालापासून श्रीसाईबाबा माझ्याकडे दिवाळीत कोणत्याना कोणत्या रूपाने येतच असतात. कारण त्यांच्या चरित्रात लिहिलेले आहेच की— राम, कृष्ण, साई यामध्ये भेदची नाही. ते अगदी खरं आहे. परंतु आपलं तेवढं प्रेम मात्र असायला हवं बाबांवर. ते म्हणतात ना?

मी माझीया भक्ताच्या अंकीला आहे उभा पासीच ठाकला! प्रेमाचा मी सदा भुकेला हांक हांकेला देतसे॥

तेव्हा त्यांना प्रेमाने हाक मारायला हवी. त्यांच्याशी नातं जोडायला हवं, मग बाबा तुमच्याकडे पण येतील.

१९७५ सालची दिवाळी. माझ्याकडे की नाई दिवाळीत चार दिवस दिपोत्सव असतो. कारण कां ? तर बाबांनी त्यावेळी पाण्याच्या पणत्या पेटविल्या म्हणून, आणि बाबा माझ्याकडे साक्षात् आहेत म्हणून, कारण त्यांचे स्थान आहे माझ्याकडे त्यांचे नाव आहे, "ताईचे श्री साईबाबा" या नावाने ते ओळखले जातात व ते प्रसिद्ध आहे. सर्व साईभक्त भाविक दर्शनाला येत असतात. त्यांची मनोकामना पूर्ण होत असते.

परंतु तरीसुद्धा आपल्या हिंदुधर्माच्या रितीरीवाजाप्रमाणे मी बाबांना दिवाळीत हात जोडून आमंत्रण करीत असते. "राजूभैय्या" दिवाळी आली बघ, भाऊबीज आली, मला ओवाळायचं आहे. तेव्हा तू आता इथे लवकरच ये हो ! उशीर लावू नकोस. तुझी वाट पहात आहे मी. कधी येशील ते सांग, पण लवकरच ये हो ! " तो काय आश्चर्य !

त्या दिवशी सोमवार होता. तो लक्ष्मीपूजनाचा दिवस होता व सकाळी १० वाजता आमच्याकडील एका ख्रिश्चन बाईने गोपाळ कृष्ण मुरलीधराची संगमरवरी सुंदर मूर्ती नव्हे साक्षात बाबाच मुरली वाजवीत उभे असलेली आणून दिली. तिची उंची वीतभर आहे. मला म्हणाली, आई ही मूर्ती घ्या तुम्हाला. दिल्लीला गेले होते ना मी मागे, तेव्हा अशीच आणली होती, मला काय करायची ठेवून. तुमचा देव आहेना तो ! मी ती पटकन जवळ घेतली व माझ्या डोळ्यातून अश्रूंचा पूर लोटला. गहिवरून आलं मला... मुरलीधरा माझी हाक ऐकलीस तू. आलास ना, असाच तू येत जा, अशीच ह्या बहिणीवर माया ठेव आणि हे नाते जन्मोजन्मी असच चालव. हीच तुझ्या चरणी माझी प्रार्थना. नंतर मी त्या मुरलीधराला लगेच पूजेला लावलं. दिवाळीचे दिवस भाऊबिजेसहित आनंदात गेले.

●

# शिर्डीस प्रथमभेट व कृपाप्रसाद

– श्री. आर. बी. वाढीवकर
उन्नत नगर नं ४, म. गांधी रोड, गोरेगाव.

● त्यावेळी नुकताच मी नोकरीस लागलो होतो. मी ज्या कंपनीत नोकरी करीत होतो. तेथे एक साधा ग्रुपलिडर म्हणून होतो. पण त्याच काळात एकाएकी

मोठ्या बंधुराजाच्या प्रेरणेने मी बाबांची रोज मनोभावे पूजा–अर्चा करू लागलो. दिवसें-दिवस बाबांची इतकी ओढ लागली की केव्हा एकदा शिर्डीस जातो व बाबांच्या समाधीचे दर्शन घेतो असे झाले होते. लवकरच बाबांच्या कृपेने तो सुदिन उगवला आणि मी एका शनिवारच्या परतीच्या एस. टी. चे रिझर्व्हेशन देखील करून टाकले. मनात खुप भीती होती. आपण तिकडे नवखे, कोण आपणाला बाबांची समाधी दाखवणार, कुठे पूजा अर्चा करायची इ० इ० पण बाबा काय भक्तांना तसच काळजीत राहू देणार? त्यांनी लगेच व्यवस्था केलीसुद्धा. एक अनोळखी गृहस्थ साधारण माझ्याच वयाचा माझ्याजवळ आला व मला म्हणाला, तुम्ही इकडे शिर्डीला प्रथमच आला आहात का? मग चला तुम्हाला मी बाबांची मंदिरे कोठे कोठे आहेत व पूजा–अर्चा कशी करावयाची ते दाखवितो. मी त्यांच्याबरोबर सर्व मंदिरे पाहिली. त्यांनी सर्व माहिती देखील मला दिली नंतर अभिषेकासाठी स्वखर्चाने पावती काढून दिली व पुढे काय करावयाचे ते सांगितले. नंतर मी त्याला अभिषेकाच्या पावतीचे पैसे देण्यासाठी खूप तपास केला परंतु तो इसम मला पुनः काही भेटला नाही.

दुसरे दिवशी रविवारी मुंबईस आलो व सोमवारी सकाळी नित्याप्रमाणे कामाला गेलो, तोच पहिल्यांदा समोरून आमचा जर्मन ऑफिसर समोर आला व मला गुडमॉर्निंग करून अगदी गुप्त सुवार्ता सांगितली ती म्हणजे "You will be Supervisor from 1st July–" काय बाबांची अगाध लीला आहे पहा! पहिल्याच भेटीत मोठी बढती? असे एक ना अनेक अनुभव बाबांनी मला दाखविले आहेत. जशी माझी भक्ती व श्रद्धा बाबांवर आहे तशीच माझ्या पत्नीचीही निस्सीम भक्ती बाबांवर असून तिला देखील असेच वारंवार अनुभव येत असतात. असेच अनुभव इतर भक्तांना येवोत अशी बाबांच्या चरणी प्रार्थना. ●

# आम्हाला साईंनी वाचवले

–श्री. वि. सी. उतेकर,
विक्रोळी

● सन १९७५ होळीच्या दिवशी मला शिर्डीला जायची इच्छा झाली. माझ्या साईसख्याच्या कृपेने माझ्याजवळ जीपगाडी आहे. त्या गाडीने जाण्याचे ठरविले. माझ्याबरोबर माझे गुरुवर्य श्री. कदमबाबा व माझे सहकारी मित्र बरोबर घेतले व होळीच्या दुसऱ्या दिवशी रात्री ११.०५ ला मी गाडी सुरू

केली. माझी गाडी रात्री तीन वाजता इगतपुरीला आली आणि आमच्या गाडीचा जॉइंट रस्त्यावर पडला त्याचा आवाज आला. त्याबरोबर गाडी थांबविली व आम्ही सर्व खाली उतरलो व पाहीले. तो गाडीचा जॉईंट बसविलेल्या डब्या पडून त्यामधील गोळ्या पण पडल्या. रात्री ३ वाजता अंधार होता. बाबांचे नाव घेऊन डब्या शोधण्यास सुरुवात केली. शेवटी आम्हाला डब्या मिळाल्या. पण डब्यात गोळ्या नव्हत्या नंतर तशाच विना गोळ्याच्या डब्या बसवून जॉइंट बसविले व बाबांचे नाव घेऊन गाडी नाशिकपर्यंत घेऊन गेलो. जर गाडीचा जॉइंट पडला तर गाडी उलटते. पण आमची गाडी बाबांनी उलटू दिली नाही. आमचे आठ माणसांचे जीव वाचविले. केवढी बाबांची आमचेवर कृपा !

*

# वाच बेटा वाच

– सौ. आशा दयानंद इंगळे,
बांगुरनगर, गोरेगाव मुं. ६३

● ॥ श्री गणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीकुलदेवतायै नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ श्री सद्गुरुसाईनाथाय नमः ॥

श्री साईबाबांचा सप्ताह सुरू झाला. रजेच्या अभावी तीन दिवसात पोथी आटपायची असं ठरवलं होतं. मोठ्या तन्मयतेनं आणि उत्सुकतेनं वाचनाला सुरवात झाली. सुरवातीचे सात–आठ अध्याय अगदी मनःपूर्वक वाचून झाले. पण का कुणास ठाऊक एकाएकी कसली तरी आठवण होऊन माझं वाचनाकडचं लक्षच उडालं. मन सैरभैर होत होतं. काहीतरी हरवल्यासारखं वाटत होतं आणि म्हणून नजर भिरीभिरी फिरत त्याचा शोध घेत होती. ती वेदना असह्य होत होती. मनाला आवर घालूनहि ते काबूत रहात नव्हतं. इतकी अनावर ओढ लागली होती. आज पोथीचा तिसरा दिवस. पोथी आज संपणार. पण अजून बाबा का आले नाहीत ? पोथीच्या वेळी हटकून दर्शन देणारे बाबा आज अजून कोठे राहीले ? काही कळत नाही. कुणाच्या रूपात तर नाहीच पण एखादं स्वप्नही नाही. असं का झालं ? का बाबांना आपलं पोथी वाचन आवडलं नाही ? एक ना दोन. अनेक प्रश्नांचा डोक्यात धिंगाणा चालू होता आणि डोळे मात्र वाचता वाचता बाबांचा वेध घेत होते. कधी भेटेल हा मायबाप ? म्हणून त्या दयाघनाला विचारीत

होते. डोळ्यानी वाचन आणि मनाने शंकाकूल अशा दुहेरी मनःस्थितीत पोथीचं वाचन चालू होतं. मधूनच नजर उगाचच सभोवार फिरवून परत ग्रंथाकडे आकृष्ट होई. त्यामुळे वाचनाकडे हवं तितकं लक्ष लागत नव्हतं. त्यामुळे आनंदाचं भरतं येत नव्हतं. वाटलं ग्रंथ बंद करावा आणि खिडकीतून ये-जा करणाऱ्या अनेक व्यक्तिंकडे निरखून पहावं. कदाचित आपले बाबा त्यात सापडतील. पण छे ! असे जर बाबा सापडले असते तर--मग इतक्या जप तप इत्यादि उपाधींची काय गरज आहे? प्रश्नोत्तराच्या भडीमारानं डोकं सुन्न झालं. बाबांचे साजीरं रुपडं हृदयाच्या कप्प्यात दृढ झालं होतं, पण ते रुप प्रत्यक्ष शाकार स्वरूपात दिसत नव्हतं.दिसत होती ती फक्त तसबीर. फोटो. साई भेटीची मनाला अपरंपार ओढ लागली होती. मनाचा भ्रमर साईकमलाकडे झेपावत होता. चातक मन मेघाचीवाट पहात होतं. पण -- पण कोठेच आशेचा किरण दिसत नव्हता. अंतर्मनातली हीच वेदना मला अस्वस्थ करीत होती. नजर त्या दयाघनाकडे खिळली होती. कंठ सद्गदित झाला होता. असंख्य लेकरं असलेला तो लेकुरवाळा साई आपल्यासारख्या एका क्षुद्र बालकाला खरोखरच विसरला की काय ह्या शंकेनं मन व्यथीत होऊन डोळ्यातून आसवांच्या सरी ओघळू लागल्या. आपलं काय चुकलं ते निश्चित कळत नव्हतं आणि कळत न कळत विकल मन त्याला सारखं विचारीत होतं की, काय अपराध घडला माझ्या हातून ? तू का दर्शन देत नाहीस ? पण लगेच लक्षात आलं हा देव आहे. भक्तांची कसोटी पहाणारा आणि भक्तांवर प्रेम करणारा. डोळयात अश्रू दाटल्यामुळे पोथीतली अक्षरे धुरकट आणि अस्पष्ट दिसू लागली. हलकेच डोळे पुसून बाबांच्या फोटोकडे एकटक पहात पोथींची पुढची पाने वाचू लागली. पण काय सांगू ? अक्षरं वाचवेना. कशी इतकी मनस्वी ओढ लागली.? कळेना. मनाचा निर्धार करून पुनः वाचायला सुरुवात केली. पण इतक्यात बाबांच्या गळ्यातला हार कुणीतरी हलविल्याप्रमाणे नाजूक हलला. म्हणून किंचित् मान वर करून बाबांच्या छबीकडे पाहीलं. तर काय अहो आश्चर्यच ! प्रतिमेतले बाबा सजीव देहधारी दिसले. अगदी अपेक्षे-प्रमाणे दिसले. भगवे वस्त्र परिधान केलेले उजव्या हातात एक जाड पण आखूड अशी काठी होती. काठीसह त्यांनी आपला हात वर केला. आशिर्वादासारखा. आणि त्यांचे ओठ विलग झाले. क्षणार्धात ते म्हणाले, 'वाच बेटा वाच' कर्णरंध्रात एकच आवाज घुमला 'वाच बेटा वाच.' मन तृप्त झालं.उभ्या आयुष्याचं सार्थक झालं. बाबांचं कोमल, चित्तवेधक हास्य रोमारोमात भिनलं. अभावितपणे दोन्ही हात जोडले गेले. नजरेला नजर भिडली. त्या दिनदयाळाच्या नेत्रात अपार वात्सल्य होतं. मुखकमलावर अवर्णनीय तेज झळकत होतं. त्या तेजाचं वर्णन करता येत नाही. त्या तेजापुढे देव्हाऱ्यातल्या नंदादिपाची ज्योत फिक्की पडली. ते तेज स्मित-हास्याबरोबर हृदयात खोल खोल शिरलं आणि अंगावर रोमांच उठले. डोळ्याचं पारणं फिटलं. प्रेमाचं भरतं आलं. काय करू ते सुचेना.अभावितपणे हृदयाच्या गाभाऱ्यातून साई

नामाचा हुंकार देणारा ध्वनि मुखावाटे बाहेर पडू लागला. मी स्तंभीत होऊन त्यांच्याकडे पहातच राहिले. अंतरात ते अपूर्व हास्य साठविण्याचा प्रयत्न करू लागले. पण–पण क्षणार्धातच डोळ्याची पापणी लवते न लवते तोच बाबा अंतर्धान पावले. क्षणभर मी बुचकळ्यात पडले. क्षणापूर्वी पाहिल ते खरंच की स्वप्न असा संभ्रम पडला. हृदयात उसळणारी वेदनेची लाट एकाएकी ओसरली. आणि तिथे आनंदाच्या सात्त्विक लहरी वाहू लागल्या. मनःचातकाला साईदर्शनाचा अपूर्व अमृतमेघ भेटला. ते आनंदाने सहर्ष डोललं. क्षणभर एक नीरव शांतता पसरली. इतक्यात पावसाची एक जोरदार सर आली. जणू म्हणाली ' वाच बेटा वाच. '

हा अनुभव नव्हे महानुभवच म्हटलं पाहिजे. ही गोड आठवण आयुष्याच्या अखेरीपर्यंत अंतर्मनाला सुखवीत राहील. आणि वाचणाऱ्या साईभक्तांसहि सुखवील. सदर घटना दि. ३१ ऑगस्ट १९७५ रोजी दु. १२ वाजण्याचे सुमारास घडली. आणि एक विशेष म्हणजे त्या दिवशी गोकुळाष्टमी होती. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या ओवीची मला आठवण झाली.

सोनियाचा दिस आजि अमृते पाहिला ।
नाम आठवितां रुपी प्रकट पै झाला ।।

●

# अगम्य साईलीला

**श्री. विलास अनंत कुलकर्णी**
'ई' वार्ड, शिवसदन, कोल्हापूर

● शिर्डीचे नावगाव, ठावठिकाण स्वतःलाच वय वर्षे ५८ पर्यंत माहित नसलेले, परंतु त्यानंतर नियमित शिर्डी मुक्कामी जाऊन येणाऱ्या एका महान साईभक्ताची चक्षुर्वैसत्यम् हकीकत मी वाचकाना सांगणार आहे. त्यांना स्वतःचे नाव प्रसिद्ध होऊ नये असे वाटत असल्याने सोयीसाठी त्याना आपण अण्णासाहेब म्हणू.

ह्या अण्णासाहेबांचे कायम स्वरूपाचे वास्तव्य कोकणातील एका आडवळणी गावी असून साधारण सुखवस्तु मध्यमवर्गीय कुटुंबप्रमुख म्हणून त्यांची गावात प्रसिद्धी आहे. हा माणूस म्हणजे गावच्या चर्चेचा विषय, कारण अण्णासाहेब म्हणजे कट्टर कम्युनिस्ट आणि टोकावरचे नास्तीक. कोणत्याही धार्मिक वा गावातील सार्वजनिक देवस्थानच्या दैवी कार्यक्रमावर अण्णासाहेब स्वतःहून हजेरी लावून

कठोर टीका करीत असत. त्यामुळे पुष्कळ वेळा त्यांचे अस्तित्व किंवा उपस्थिती लोकांना अडचणीत आणीत असे.

आणि अशाच एका सायंकाळी (वयाच्या ५८ व्या वर्षी) त्यांना एकाएकी अर्धांग वायुचा झटका आला; नियतीचा खेळच इतका विचित्र होता की, पहिल्याच झटक्याचे वेळी शरिराची पूर्ण उजवी बाजू लुळी पडली व वाचा बंद झाली. घरच्या मंडळींनी शक्य तो सर्व दैवी व वैद्यकीय उपचार केले. त्यावेळी काढलेले त्यांचे छायाचित्र त्यांनी मला दाखविले आणि ते बघून मीही चकितच झालो.

दिवसामागून दिवस जात होते, आणि एके दिवशी पहाटेला (गुरुपौर्णिमेला) त्यांना असा स्पष्ट दृष्टांत झाला की, उठ! तुझी तब्येत पूर्ण बरी झाली आहे, माझ्या दर्शनास ये! आणि यानंतर आण्णासाहेबांच्या आयुष्यात महान स्थित्यंतर घडले स्वप्नात पाहिलेल्या व्यक्तिचा कोणताही पूर्वपरिचय नव्हता, मग नाव माहित असणे दूरच! योगायोगाने बाजारहाटासाठीं ते मालवणला आले, व एका हॉटेलमध्ये त्यांनी आपल्याला दृष्टांन्तात दर्शन दिलेल्या व्यक्तीचा फोटो पाहिला व दुकानदारास विचारते झाले की, हा फोटो कोणाचा?

तो फोटो भगवान श्रीसाईबाबांचा, शिरडीस त्यांचे वास्तव्य असून ते एक पावन क्षेत्र आहे असे समजल्याबरोबर तावडतोब इतर सर्व कामे बाजूस ठेवून स्वतःच्या जुन्या शेव्हरलेट गाडीने स्वतः ड्रायव्हींग करून ते शिरडीस पोहचले. ज्यावेळी ते शिरडीहून परत आले, त्यावेळी लोकांच्या आश्चर्याला धक्काच बसला. अर्धांगवाताच्या झटक्याने अर्धे शरीर दुबळे झालेला ५८ वर्षे वयाचा म्हातारा स्वतः ड्रायव्हींग करीत शिरडीस जाऊन येतो म्हणजे काय?

आजही दरवर्षी नित्यनेमाने त्यांची शिरडीवारी चालू आहे. वयाची ७२ वर्षे उलटून गेलेली असली तरी उत्साह अमाप आहे. साईनिष्ठेला तर सीमाच नाही. पूर्ण नास्तिक माणसाला संपूर्ण आस्तिक बनवून त्याला भक्तिमार्गावर आणून सोडणारी श्रीसाईलीला खरोखरच अगम्य आहे.

# साई माझे आई

– कु. हिरा गुंडेराव पटवारी
विदर

● माझं नाव हिराबाई, माझे वय १४ वर्षं, मी सातवी मराठी शिकते आणि बाबांच्या कृपेनेच मी पास झाले ! पाच वर्षापूर्वी माझी आई वारली, आम्ही तीन बहिणी आणि दोन भाऊ, घरी ७० वर्षांची आजी आहे ! पाच वर्षापूर्वी जेव्हा आईचा स्वर्गवास झाला तेव्हा दुःख तर होतेच परन्तु ऐकण्यात आले की वडील दुसरे लग्न करू लागले आहेत. तेव्हा दुस दुःख सावत्र आईचं आमच्या समोर उभं राहिले, पण साईच्या कृपेनेच पुढे वडिलांनी दुसरं लग्न केले नाही आणि आम्ही आमच्या आई (आजी) बरोबर सुखाने दिवस घालवू लागलो ! माझे वडील हे ही साईभक्त आहेत, सदा सर्वदा सांगत असतात की "मुलानो, घाबरु नका साई तुमची आई आहे ! मला साईनं स्वप्नात येऊन दुसरं लग्न करू नको असे सांगितले आहे." वडील एका स्थानिक कॉलेजात हिन्दी चे प्राध्यापक आहेत, हिन्दी आणि ऊर्दू चे प्रसिध्द कवि आहेत. आजकाल केवळ साईबाबा विषयीच कवितांची रचना करतात, किती साईची कृपा आमच्यावर आहे ! मार्च १९७६ मध्ये जेव्हा सातवीची परीक्षा दिली तेव्हा कोणालाच विश्वास नव्हता माझा पास होण्याचा. साईकृपेनेच मी उत्तीर्ण झाले. आजकाल साईबाबांच्या कृपेनेच कोणाला ही रोग नाही, सर्वांना बाबांनी सुखी ठेवलय. खरोखर बाबांची लीला अगाध आहे ! आमच्यावर अनेक संकटे आली आहेत, पण बाबांचे नाव घेताच ती कुठच्या कुठे पार उडून जातात, खरोखर साईच माझी आई आहे !

※

# साई माझा पाठीराखा

– सौ. यशोधरा वसंत वागळे
डी.–१० मॉडेल हाऊस ३ रा माळा
प्रॉक्टर रोड, मुंबई ४.

● जगात जेवढ्या विभूति झाल्या त्यात बाबांचे नाव गुंफले तर नवल काय ? बाबा आपल्या भक्तांना मातृवात्सल्याने धीर देतात, दीन दुबळ्यांना जवळ घेतात, बाबा

गरीबांचा वाली, दीनांचा कैवारी, बाबा भक्तांना हात धरून चालवतात. त्याचप्रमाणे ही खरी घडलेली गोष्ट आहे.

गेल्याच वर्षीची गोष्ट. ५ मार्च १९७५ मध्ये माझे पति वसंतराव वागळे हे एकाएकी आजारी पडले. त्यांना तावडतोब "हरकिसनदास हॉस्पीटलमध्ये नेण्यात आले. १०-१५ दिवसानंतर त्यांचे प्रोस्टेटग्लँड चे ऑपरेशन करण्याचे ठरविले. ऑपरेशनच्या दिवशी "ऑपरेशन थिएटर"मध्ये नेताना आम्ही सर्वजण तेथेच होतो. अन् काय चमत्कार! त्यांच्या हातातील श्रीबाबांची अंगठी उडाली व मजजवळ आली. तेव्हा बाबा मला सांगत होते, धीर देत होते, "घाबरु नकोस; मी जवळ आहे, मी पुढे आहे." असे बोलून त्यांनी मला धीर दिला, आणि खरोखरच ते ऑपरेशन बाबांच्या कृपेमुळे यशस्वी झाले.

काही दिवसानी ह्यांना घरी आणले. पुढे ह्यांना कावीळ झाली तेव्हा पण बाबांनी धीर दिला. २३ फेब्रुवारी १९७६ रोजी परत हे अचानक आजारी पडले. घरी डॉक्टरला बोलवण्यात आले. डॉक्टराने १५ मिनिटांच्या आत हॉस्पिटलमध्ये नेण्यास सांगितले. आम्ही फारच घाबरलो. शेवटी त्यांना नायर हॉस्पिटलमध्ये नेण्यास सांगितले. त्यामुळे आम्ही 'नायर हॉस्पीटल'मध्ये त्यांना रात्री ११वा. दाखल केले. त्यांच्याबरोबर आम्ही "एक्स रे" चे पेपर घेऊन गेलो होतो—ते पेपर उघडताच बाबांचा आशिर्वादाचा प्रेमळ हात पाहून धीर आला. तेव्हा पण बाबा सांगत होते घाबरु नकोस, मी आहे.

जीवनात आधारस्तंभ असलेले हे बाबा खरोखरच माझे पाठीराखे आहेत. ●

# साई साई नाम घोका
# योग्य समई टळेल धोका!

— कु. शशिकला ल. बोरवणकर
बोरवणकर वाडी, चरई, ठाणे—१.

● "साई साई नाम घोका। योग्य समई टळेल धोका।।

ह्या ओळीचे प्रत्यंतर आम्हाला कसे आले त्याचे थोडक्यात वर्णन मी करते आहे.

आम्ही ज्या घरात राहात होतो ते घर अर्धे पाडलेले होते, आणि त्यामुळे आधारासाठी जी भिंत बांधली होती ती तशी एका विटेची आणि कच्ची होती. नवीन घर आम्हाला जून ७६ च्या पहिल्या आठवड्यात मिळणार होते. पण काहीअडचणीमुळे

उशीर झाला. त्याच सुमाराला मोठे वादळही झाले. येणारी-जाणारी प्रत्येक व्यक्ती आमच्याकडे आल्यावर भिंतीविषयी चिंता व्यक्त करीत होती. पण आम्ही घरची मंडळी खास करून वडील प्रत्येकाला सांगायचे, जोपर्यंत साईबाबा आमच्या पाठीमागे आहेत तोपर्यंत आम्हाला काही चिंता नाही, आणि खरोखरच आश्चर्याची गोष्ट, इतका पाऊस वारा, त्यात भिंत बाहेरच्या बाजूला कललेली. पण भिंतीला जराही धक्का बसला नाही. आम्ही मात्र रोज उदी लावून झोपत होतो, आणि आजही झोपतो. अखेरीस आम्ही त्या संकटातून वाचलो, बरोबर एक महिन्याने ४ जुलैला आम्ही नव्या घरात गेलो. पण मधल्या काळात खरोखर आमच्या कुणाच्याही केसाला देखील धक्का लागला नाही. आम्ही सर्व सुखरूप राहिलो. या सर्वामागचे आधारस्तंभ बाबाच आहेत. अशीच कृपादृष्टी त्यांची भक्तांवर राहो.

# केवढी किमया प्रभु साई

–श्री. दशरथ रामजी तळेकर
मुकेश मिल कंपाऊंड, व्हिक्टोरिया बंदर रोड,
पी/६, कुलाबा, मुंबई–५.

* त्या वर्षी म्हणजे १९७३साली घडलेली ही एक आश्चर्यकारक पण सत्यकहाणी आहे. माझी एस. एस. सी.ची परिक्षा नुकतीच आटोपली होती, आणि मी मे ची सुट्टी अगदी आनंदात व मजेत घालवीत होतो. मेच्या सुट्टीचा आनंद अगदी न्याराच असतो. अभ्यासाचे ओझे बाजूला ठेवून मित्र-मैत्रिणीसमवेत प्रत्येक दिवस आनंदात घालवायचा हेच शालेय विद्यार्थ्यांना ठाऊक.

मी सुद्धा माझ्या मित्रांबरोबर सबंध दिवसभर रानावनातून, पर्वत कड्यावरून मुक्तपणे हिंडलो, फिरलो. काजू, आंबे, फणस, करवंदे इ. रानचा मेवा मिळवून खाल्ला. कधी दुपारी विहीरी तलावांमध्ये स्वैरपणे मनसोक्त पोहोलो. एकंदर मे ची सुट्टी हसून हसवून, खेळून व मौजमजा करून आनंदात घालविली.

सुट्टीत खेळ तर खेळायचोच. पण अधूनमधून घरची कामे सुद्धा मी मोठ्या आवडीने करीत असे. कधी वडीलांबरोबर शेतावर जाणे, आईबरोबर मळ्यात जाणे. इ. कामे सुद्धा मी करीत असे. मे महिन्यातील अशाच त्या काळयाकुट्ट रात्रीची मला आठवण झाली की मग मात्र माझ्या अंगावर काटा उभा राहिल्याशिवाय रहात नाही.

मला पूर्ण आठवतो तो दिवस. १३ मे १९७३ चा होता. या दिवशी मी व माझे वडील असे आम्हीं दोघे मिळून आमची बैलगाडी घेऊन मुरुड (जंजीरा) येथे भात दळण्यासाठी गेलो, होतो. मुरुड हे शहर माझ्या 'खाजणी' गावापासून आठ मैल अंतरावर आहे. रस्ता दगड, मातीचा म्हणजे कच्चा आहे. आम्ही मुरुडला बैलगाडी घेऊन दुपारी ठीक बारा वाजता भात गिरणीवर पोहचलो. तिथे भात दळण्यासाठी नंबर लावला. नंबराप्रमाणे आम्हाला संध्याकाळी ठीक सहा वाजता भात दळून मिळाला. भात दळून मिळाल्याबरोबर तांदळाच्या गोणी गाडीत घालून आम्ही घरचा रस्ता धरला.

दोन मैल रस्ता चालल्यानंतर आम्हाला काळोखाने चोहोबाजूंनी घेरले. म्हणून मी सोबत आणलेला कंदील (दिवा) पेटवून गाडीच्या पुढे धरून पुढचा रस्ता चालू लागलो. रात्रीचे आठ वाजले होते. सभोवार दाट काळोख पसरला होता. रातकिड्याचे आर्त स्वर कानावर येत होते. अल्लड वारा बेभान धावत होता. त्याच्या तालावर वृक्ष आनंदाने डोलत होते. मधूनच टिटवीचे ओरडणे ऐकू येत होते. अशा या भयंकर काळोखाच्या रात्री बाबा बैलांना हाकीत होते व मी गाडीच्या पुढे चालून बैलांना उजेड दाखवित होतो.

नतर तीन मैलाचे अंतर चालून गेलो असेन नसेन तोच कंदीलातील रॉकेल तेल संपले आणि कंदील विझला. झाले ! सगळीकडे अंधारच अंधार. जवळपास गाव सुद्धा नव्हते आणि रात्रीचे दहा वाजले होते. आम्ही थोडेसे निराश झालो. पण तरीही न घाबरता आमच्या घरच्या रस्याने आम्ही गाडी हाकण्यास सुरुवात केली. मी गाडी हाकावयास बसलो आणि माझे वडील मागच्या बाजूला बसले.

अंधार मी म्हणत होता. वाट (सडक) सुद्धा दाट झाडीतून होती. रात्रभर रस्त्यात थांबून रहाणे अशक्य होते. कारण जंगलातील आदीवासी (कातकरी) लोकांचा भरवसा नव्हता आणि आमच्या गाडीत तर तांदूळाच्या पाच गोणी होत्या. आम्ही भीत भीतच रस्त्याने बैलगाडी हाकीत होतो. मनात अनेक शंका कुशंकानी घर केले होते. बैल धीरे धीरे नेहमीचा पायाखालचा रस्ता तुडवित चालले होते.

अंधाराचा पडदा फाडीत फाडीत आमची बैलगाडी एक मैल अंतर चालत गेली असेल नसेल तोच आमच्या गाडीच्या समोरून तीन व्यक्ती आपआपसात कुजबुजत येताना दिसल्या. माझ्या काळजाचे पाणी झाले. मी गाडी जागच्या जागी थांबविली. बाबांनी मला गाडी थांबविण्याचे कारण विचारले. पण मी काहीच बोललो नाही. इतक्यात समोरून येणाऱ्या तीन व्यक्ती आमच्या गाडीच्या समोर येऊन थांबल्या. बाबा सुद्धा घाबरले. माझ्या अंगाला कापरे भरले. ओरडून व पळून काहीच उपयोग होणार नव्हता. मदतीला धावून येणारे असे कोणीच नव्हते. या शिवाय अनोळख्या व्यक्ती तीन होत्या. आम्ही दोघेजण त्यांना काहीच करू शकत नव्हतो.

त्या धिप्पाड उंच व्यक्तींपैकी एकाने आम्हाला करड्या आवाजात मोठ्याने विचारले, ' कोण तुम्ही ? कुठे चाललेत ? गाडीत काय आहे ? गाव कुठले ? '

बंदुकीतून गोळ्यांची फैर झाडावी तशीच लागोपाठ प्रश्नांची फैर झाडून विचारणारी व्यक्ती गप्प झाली. संकट तर मोठे बिकट होते. म्हणून बाबा घाबऱ्या आवाजात म्हणाले, ' आम्ही खाजणी गावचे रहाणारे, भात दळण्यासाठी मुरुडला गेलो होतो. '

त्यावर त्यातील एकजण म्हणाला, ' गाडीतून खाली उतरा आणि किती पैसे आहेत ते इकडे द्या. '

संकटातून सहीसलामत सुटण्याचा एकच मार्ग असतो तो म्हणजे मुकाट्याने शत्रूला शरण जाणे. आम्हीसुद्धा याच मार्गाचा अवलंब करण्याचे ठरवून गाडीतून खाली उतरलो. मनात मी ' साईबाबांचे स्मरण ' केले. आणि पैसे काढून देण्यासाठी खिशात हात घातले, तोच एक चमत्कार झाला......

समोरूनच हातात चार कंदील ( दिवे ) घेऊन चार व्यक्ती माझ्या वडिलांच्या नावानी हाका मारीत येताना दिसल्या. आम्हाला बराच धीर आला. मात्र आम्हाला ज्या तिघा गुंडांनी घेरले होते त्यांच्या अंगाला थरकाप भरला, आणि मग मागे पुढे न पहाता ते तिघेही जण पळायला लागले. तेव्हा मग मला आणखीच स्फुरण चढले, आणि मग रस्त्यावरील दगडी हातात घेऊन मी त्यांच्या पाठीमागून फेकू लागलो.

थोड्याच वेळात कंदीलवाल्या चार व्यक्ती आमच्याजवळ येऊन ठेपल्या. त्यांनी आमची विचारपूस केली. आम्ही सर्व हकीगत निवेदन केली. आमची हकीगत ऐकून त्यातील दोन व्यक्तींनी आम्हाला कंदील घेऊन आमच्या गावापर्यंत पोहचवायला येण्याचे कबूल केले, आणि त्यातील दोन व्यक्ती आल्या वाटेने निघून गेल्या.

त्या दोन व्यक्तींनी आम्हाला आमच्या गावच्या वेशीपर्यंत आणून सोडले आणि मग त्यांनी आमचा निरोप घेतला.

आम्ही त्यांना घरी येण्याचा खूप खूप आग्रह केला. पण घरी येण्यास त्यांनी नापसंती दर्शविली. तेव्हा रात्रीचे साडेबारा वाजले होते. मी त्यांना नाव गाव विचारले असता ते म्हणाले, ' आम्ही चौघेही जण एकत्र जंगलात रहातो. आम्हाला नावे गावे वगैरे काहीच नाहीत. इतके सांगून ते घाईघाईने निघून गेले.

आम्हाला साऱ्या प्रकाराबद्दल खूप आश्चर्य वाटले. आम्ही तसेच गाडी घेऊन ' साईबाबांचे आभार ' मानून घरी आलो. तांदूळ घरी ठेवला आणि झोपी गेलो. सकाळी उठून प्रथम रात्री घडलेली हकीकत गावातील सगळ्या माणसांना सांगितली.

सर्वजण हकिगत ऐकून आश्चर्यचकीत झालेच. पण त्याबरोबर सर्वांच्या तोंडून मला एवढेच ऐकायला मिळाले....... ते म्हणाले —

" साईनाथ महाराजांचा तू भक्तच आहेस. म्हणूनच रात्री तुम्ही चोरांच्या हातून सुटून सुखरूपपणे घरी आलेत आणि तुम्हाला पोहोचविण्यास आलेले दुसरे तिसरे कोणीच नसून प्रत्यक्ष ' साईबाबाच ' दुसऱ्या वेषात आले असावेत. त्यांच्या-शिवाय दुसरे कोणीच नाही. "

खरोखरच बाबा भक्तांसाठी किती त्रास घेतात, नाही ! किती रुपे, किती वेष घेऊन भक्तांची कामे करतात. नाही काय ? खरोखर भक्तांसाठीच त्यांचे जीवन आहे बरं ! भक्तांसाठीच ते अवतीर्ण होतात. पण त्यांच्यावर श्रद्धा आणि भक्ती असावयास पाहिजे. नाहीपेक्षा तुमचे कुठलेच काम यशस्वी होणार नाही.

# साईनाम सुखदाई है !

--श्री. राधाकृष्ण गुप्ता, ' चेतन '
पाटकर वाडा, भगतसिंग पथ,
डोंबिवली ( पूर्व )

● श्रीक्षेत्र शिरडी जाने का प्रथम अवसर मुझे १९७४ में मिला। इस प्रसंग को मैं अपने जीवन में बडा महत्त्वपूर्ण अनुभव व साईप्रेरणा समझता हूँ। सन १९७४ में श्री देवी की प्रेरणा से मुझे ' दुर्गा सप्तशती ' के पाठ पठन करवाने की आज्ञा हुई। आज्ञानुसार मैंने नवरात्रीमें 'दुर्गा सप्तशती' के पाठ पाच मंगलवार के दिन करवाये। पाँचवे मंगलवार के दिन यज्ञविधी समाप्ती हुई। संयोग समझिये या देवी कृपासे, मैं दूसरे दिन बुधवार को निकलकर सिधे शिरडी पहूँचा और गुरुवार के दिन साईबाबा की पालखी में शामिल हो गया। इस प्रकार यह मेरी प्रथम यात्रा हुई। कविके नाते मैंने २ रे लेखक-कवि सम्मेलन फरवरी १९७६ में दूसरी बार शिरडी यात्रा की।

अब जुलाई ७६ की घटना और यह अनुभव ताजा हैं। मुझे ऑफीस के कामसे साहब के साथ दौरेपर जाना पडा। येवला कोपरगांव, होते हुए हमें औरंगाबाद जाना था। दौरेपर निकलने के पहले मैंने साई नामस्मरण कर प्रस्थान किया। हमें प्रथम येवला जाना था। हमारे रहनेका प्रबन्ध रातमें गोदावरी शुगर फेक्टरी के गेस्ट हाऊसमें किया था। दूसरे दिन हम सब लोग अचानक शिरडी साईबाबाके दर्शन के लिये गये। साईबाबाके दर्शनसे मेरा मन बडा प्रफुल्लीत हो रहा था। और मैं स्वर्गिय सुखका आनंद ले रहा था। साकोरी होतेही हम लोग कार्यक्रमनुसार येवला पहुँचे। मन बार बार यही कह रहा था कि श्रद्धा और

सबूरी ही सच्चे सुख की गुरुकिल्ली है। साईं नामस्मरण ही सच्ची कमाई है जिससे एक विशेष आनंद का अनुभव मिलता है।

भावी संकट की संभावना को जानते हुए अंतर्यामी साईबाबा अपने भक्तोंकी सदा सहायता करते हैं तथा उनका कष्टभार हरते हैं। वैसेही बाबा ने मेरा भी कष्टभार हर लिया और अपने गुणगान करने के मन को अधिक आकर्षित किया। अनायास ही मेरे मन में ये काव्य पंक्तियाँ उभरने लगी —

साईं ! तेरो नाम बड़ा ही सुखदाई है
'नामस्मरण' ही जग में सच्ची कमाई है ॥ टेक ॥

नाम को भजते अति सुख लागे
भव पीड़ा सब क्षण में भागे
प्राची में अब उदित हुई ये अरुणाई है ॥ १ ॥

संतजनों की अमृत वाणी
प्रातःस्मरण करते प्राणी
सुन्दर पदों में नाम की महिमा गाई है ॥ २ ॥

नाम मधुर है, प्यारे साईं
अनुभव ऐसा, सुन लो भाई
नाम मुरली से गुंजित मन की अमराई है ॥ ३ ॥

नाम है आदि, नाम अंतिम
साईमय हो जीवन अंतिम
संकटमोचन साईं नाम ही वरदाई है ॥ ४ ॥

रघुपति राघव राजाराम
पतितपावन है साईराम
अंतर्यामी, मेरे स्वामी प्रिय साईं है ॥ ५ ॥

# साई तेरा सहारा

— दत्ताराम आ. बारस्कर
१६ संतसेनामहाराजमार्ग, गिरगाव मुंबई ४.

● गेल्या वर्षीच्या दिवाळीतला प्रसंग. 'जास्वंद'च्या दिवाळी अंकात माझी 'हे फूल उंबराचे' ही कादंबरी प्रसिद्ध झाली होती. अंकातील कादंबरी जास्वंदचे संपादक श्री. अजित निखार्गे हे आपल्या सुमनिषा पब्लिकेशन्सतर्फे पुस्तक रुपाने प्रसिद्ध करणार होते. पुस्तकाच्या आकारात कादंबरीची पाने छापून तयार झाली. पद्मश्री अनंत काणेकर यांची कादंबरीला प्रस्तावनाही लाभली. पण मुखपृष्ठामुळे प्रकाशन अडले.

सगळी तयारी झालेली पण मुखपृष्ठावर चित्र कुणाकडून करून घ्यायचे या विचारात लेखक-प्रकाशक आम्ही दोघेही होतो. धंदेवाईक आर्टिस्टकडून मुखपृष्ठ तयार करून घेणे आणि तेही तीनचार रंगांचे, खर्चाच्या दृष्टीने प्रकाशकांना परवडणारे नव्हते. शेवटी मीच एखाद्या ओळखीच्या हौशी चित्रकाराकडून ते तयार करून द्यायची जबाबदारी स्वीकारली.

खूप शोध घेतल्यावर परळचे माझे एक स्नेही कै. रामचंद्र बस्तावडेकर यांच्या परिचयाचा एक तरुण उत्साही चित्रकार श्री. तळाशीलकर याला कथानकाची कल्पना देऊन चित्र काढावयास सांगितले. ऐन दिवाळीच्या गडबडीत त्याने चित्र काढले. पण रसिक मित्रांनी आणि प्रकाशकांनी ते नापसंत केले. पुन्हा गाडे अडले. नव्या चित्रकाराचा शोध घेणे क्रमप्राप्त झाले. काय करायचे ? काहीच सुचेनासे झाले. जवळपास कुणी चित्रकार असल्याचे दृष्टीपुढे येईना, स्मरणात येईना. मी खूपच निराश झालो होतो.

त्या दिवशी मी घरात कॉटवर चिंतातुर होऊन बसलो होतो. माझ्या कॉटच्या समोर भिंतीवर एक लहानसे पुस्तकांचे कपाट आहे. त्या कपाटात मी माझ्याकडे आलेले नवे पुस्तक दर्शनी लावून ठेवित असतो. नुकतेच त्यावेळी कवी श्री. शशिकांत तोंडवळकर यांचे – 'श्री **साईगीत दर्शन**' हे साईबाबांवरील गीतांचे पुस्तक प्रसिद्ध झाले होते. त्यांनी ते मला सप्रेम भेटीदाखल पाठविले होते. मी ते माझ्या कपाटात लावून ठेवले होते.

या पुस्तकावरचे श्री अशोक सीताराम पिलवकर यांनी चितारलेले आशीर्वाद देणारे श्री साईबाबांचे चित्र इतके अप्रतिम आहे की त्याकडे सतत पहात रहावेसे वाटते. हे रंगीत चित्ताकर्षक चित्र मी एकटक पहात बसलो होतो. 'श्रद्धा आणि

सबुरी' हे दोन शब्द जुळ्या बहिणीसारखे त्या चित्राच्या कोपऱ्यात होते लक्षवेधी असे!

कसे कोण जाणे? त्या चित्राकडे मी पहात असतानाच मला श्री साईबाबांच्या त्या चित्राकडून आदेश मिळाला, "तू कामगार भागात जा. तुझे काम होईल!" अकल्पितपणे मिळालेल्या त्या आदेशाने माझ्या सर्वांगात उत्साहाची वीज संचारली मी ताडकन उठलो. गिरगावातून जायची तयारी केली. चिंचपोकळीला डॉक्टर कंपाऊंडमध्ये माझा धाकटा भाऊ रहातो. त्याच्याकडे जातयेत असताना कामगार भागातील नाट्यसंस्थांचे सुंदर बोर्ड चितारलेले मी पाहिले होते. वाचले होते. त्यावरून माझ्या मनाची पक्की खात्री झाली की, आपणाला चित्रकार हमखास मिळणार!

मी बंधुकडे गेलो. तिथल्या एका कार्यकर्त्यांना बोलावले व त्याच्याकडे, 'तुमच्याकडे कुणी चित्रकार आहे का? आमचे असे असे काम आहे, एवढे होईल तर बरे!' असे त्याला म्हटले. त्याने आपणाकडे उत्तम आर्टिस्ट असल्याचे सांगितले व काम करून देतो असे तो म्हणाला.

आठ दहा दिवसांनी मी गेलो. तेव्हा त्या कार्यकर्त्याने माझ्या हाती चित्र दिले. चार पाच रंगाने रेखाटलेले ते चित्र इतके अप्रतिम झाले होते की–दलाल–मुळगावकरां सारख्या जागतिक कीर्तीच्या रंगसम्राटाने काढल्यासारखे ते वाटत होते. मी खूप झालो. त्या कार्यकर्त्याचे आभार मानले. चित्रकाराचे देखील! त्या चित्रकारचे नाव श्री. गुजर! श्री गुजर यांनी माझ्याकडून एक पै देखील घेतली नाही हे विशेष! इतकेच काय पण पुस्तकावरच्या मुखपृष्ठावरील त्यांच्या हातून तयार झालेले ते पहिलेच चित्र असल्याने त्यांनी आपले नावही न छापण्याची अट घातली.

मी पुस्तकावरचे मुखपृष्ठ आता पाहू लागलो–कुणाला दाखवू लागलो की, मला श्रीसाईबाबांच्या चमत्काराची आठवण होते, आणि मी न कळत बोलून जातो–' साई तेरा सहारा ' हेच खरे!

## अडकलेली गाडी

–श्री. लिलासिंग भावसिंग मंडाले
भाजी मार्केट समोर,
मु. पो. शिरपूर, धुळे

● मी एकदा चोपडा रस्त्याने येत होतो. दिवस पावसाळ्याचे होते. मी स्वतः टॅक्सी चालवित होतो. नाल्यांना पाणी होते. एका नाल्यात गाडी आली आणि बंद

पडली. पाण्याला जोर होता. गाडीत ८।१० उतारु होते. गाडीत पाणी घुसु लागले. ती पालथी होण्याच्या बेताल होती. लोकांना मदतीला हाक मारू लागलो. परंतु कोणीही येईना थोड्याच वेळात पाण्याने मोठे स्वरुप घेतले. मी श्रीसाईबाबांचा धावा करू लागलो. गाडीला एकवटून बळ दिले. आणि काय नवल! यक्षिणीची कांडी फिरावी त्या प्रमाणे गाडी कोणी तरी पुढे ढकलून दिली. मला आनंद झाला. श्रीबाबांची कृपा म्हणून मी सुखरुप घरी आलो. तो दिवस मी कधीही विसरणार नाही.

# मी साईभक्तच झालो

— **रामचंद्र अमृतराव देशमुख**, शिर्डी

● मला श्रीसाईबाबांच्या मंदिरात जाण्याचा फार कंटाळा येत असे. परंतु माझी मुलगी ज्यावेळी विषमज्वराने आजारी झाली तेव्हा तिला श्रीसाईबाबांच्या दवाखान्यात नेले, औषधोपचार सुरू होते. आराम पडण्याचे चिन्ह दिसेना. माझ्या आईची श्रीबाबांच्या वर पूर्ण श्रद्धा त्यांनी मुलीला श्रीबाबांचे स्नानाचे तीर्थ व उदी पाजली व काय आश्चर्य, १५ दिवसात मुलीला आराम पडला. त्यामुळे मी आता पूर्ण साईभक्त बनलो आहे. ही सर्व साईमाऊलीची कृपा असे समजून मी चालतो.

मी रोज संध्याकाळी श्री साईचरित्र वाचन सुरू केले. ते पावसाळ्याचे दिवस होते. ज्यावेळी पोथी वाचन सुरू होई त्यावेळी एक बेडुक पोथी सुरू होण्याआधी एका कोपऱ्यात येऊन बसत असे. पोथी संपली की तो उड्या मारीत निघून जाई. हा आश्चर्यकारक प्रकार पाहून आमचा असा समज झाला की श्री साईबाबाच पोथी ऐकावयास येत असतात की काय? कारण कोणत्याही रूपाने मी येईन, ही त्यांची वाक्ये आठवतात. ●

# श्रीसाईबाबांच्या कृपेने परीक्षा पास झालो

— **दत्ताराम बाळकृष्ण कांबळे**
शिवाजी नगर, सातारा

● मी केवळ साईबाबांच्या कृपेने परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकलो. हा एक सत्य अनुभव मला नुकताच आलेला आहे. त्याबाबत कुठल्याही प्रकारे अतिशयोक्ती न करता तो पुढील प्रमाणे देत आहे.

गत वर्षी मी बी. ए. च्या शेवटच्या वर्षी होतो. बी. ए. ला मी इंग्रजी स्पेशल हा विषय घेतलेला होता. कॉलेजच्या पहिल्या वर्षापासून माझी बी. ए. इंग्रजी स्पेशल घेण्याची इच्छा होती. इंग्रजी विषयाबद्दल मला आवड आहे, आणि त्याप्रमाणे मी गतवर्षी बी. ए. ला इंग्रजी स्पेशल हा विषय निवडला होता.

माझी आर्थिक परिस्थिती बेताचीच आहे. अभ्यासामधील प्रगतीही बेताचीच, अशा परिस्थितीत इंग्रजी स्पेशल सारखा अवघड विषय घेऊन पास होणे अशक्यच होते. केवळ माझ्या तीव्र इच्छेमुळेच मी हा विषय निवडलेला होता. अभ्यासही चालू होता. तरीही परीक्षेतील यशाबद्दल मन साशंक होते.

अशा गोंधळलेल्या अवस्थेत कॉलेजची पहिली टर्म संपून दिवाळीची सुट्टी सुरु झाली. या सुट्टीमध्ये असेच एकेदिवशी मी सहज नगरवाचनालयामध्ये गेलो होतो. तिथे " साईलीला " हे नुकतेच प्रकाशित झालेले मासिक माझ्या वाचनामध्ये आले. सदर मासिकामधील साईभक्तांचे अनुभव की ज्यामध्ये बाबा आपल्या भक्तांना संकट, अडचणींच्या प्रसंगी धावून येत व भक्तांची संकटापासून मुक्तता करीत. तसेच बाबांनी भक्तांना दाखविलेले साक्षात्कार, हे सर्व वाचल्यानंतर माझे मन, हृदय श्रीसाईबाबांच्या-बद्दल भक्तीने कृतज्ञतेने भरुन आले, आणि त्यावेळेपासूनच माझी खात्री झाली की माझी बी. ए. ची परीक्षाच नव्हे तर माझे संपूर्ण जीवन यशस्वी होण्यासाठी सन्मानाचा मार्ग आणि तो म्हणजे साईबाबांची भक्ती. त्यावेळेस साईबाबांचे छायाचित्र विकत घेण्याचे ठरवून लगेच मी नगरवाचनालयामधून बाहेर पडलो. काय आश्चर्य! थोड्याच अंतरावर एक तरुण मुलगा श्री साईबाबांची उत्कृष्ट छायाचित्रे विकत असलेला दिसला. त्याच्याकडून मी एक छायाचित्र विकत घेवून माझ्या खोलीमध्ये लावले. त्या दिवसा पासून मी बाबांची दररोज सकाळ, संध्याकाळ भक्ती भावाने पूजा करु लागलो.

सुट्टी संपून कॉलेज सुरु झाले. दिवस जात होते. परीक्षा जवळ येत होती. माझा अभ्यास बाबांच्यावर श्रद्धा ठेवून चालूच होता. अखेर परीक्षेचा दिवस उजाडला. पहिला पेपर बरा गेला. दुसरा टीकाशास्त्र हा पेपर अतिशय अवघड गेला. त्याचा परिणाम राहिलेल्या तीन पेपरांवर झाला. अशा चिंताजनक परिस्थितीमध्ये मी परीक्षा कशीबशी संपवली.

परीक्षा संपल्यानंतर निकालाचा दिवस जवळ येवू लागला. मन मात्र काळजी, दुःखाने पूर्णपणे भरुन गेलेले होते. पास होण्याची आशा पूर्णपणे मावळली होती. बाबांच्यावर श्रद्धा कायम होती. बाबांची भक्ती नियमितपणे चालूच होती.

अखेर निकालाचा दिवस उजाडला, माझे एक नातेवाईक नगरला गेले होते. येताना ते शिर्डीहून बाबांची उदी घेवून आले होते. त्यांच्याकडून उदी घेवून ती पुडी

निकालाच्या दिवशी माझ्याजवळ होती. त्या दिवशी बराच वेळ वर्तमानपत्रामध्ये निकाल पहाण्याची इच्छाच होत नव्हती. अखेर मनाचा निर्धार आणि साईबाबांचे नामस्मरण करीत व उदी हातामध्ये घेवून मी माझ्या परीक्षेचा निकाल वर्तमान पत्रामध्ये पाहू लागलो आणी काय आश्चर्य! माझा उत्तीर्ण क्रमांक पाहून जो आनंद झाला तो खरोखरच अवर्णनीय होता. बाबांच्या भक्तीने माझे ह्रदय भरून आले. केवळ बाबांच्या कृपेनेच मी परिक्षेत यशस्वी होऊ शकलो. तसेच बाबांच्या भक्तीमुळे मी यावर्षी पुष्कळ अडी–अडचणीही निभवू शकलो.

प्रभू साईबाबांच्या चरणी या साईभक्ताची, या लेकराची येवढीच प्रार्थना की या लेकराकडून श्रीसाईबाबांच्या चरणांची भक्ती आयुष्यभर घडू दे.! ●

# जैसी जयाची भावना फळ तैसा जाणा

**श्री. अमृतराव नलावडे**
न्यू मल्कापेट, हैद्राबाद

● खरोखरच डिसेम्बर १९७५ च्या महिन्यात शिर्डी देवस्थानी गेल्यानंतर घडलेली हकीगत.

● मी डिसेम्बर १९७५ च्या तिसऱ्या आठवड्यात शिर्डीस दर्शनास गेलो. मी त्या पूर्वी बरेच वेळा गेलो होतो. पूर्वी गेलो तेव्हा मी बाबांकडून आशीर्वाद घेतला होता की, ३१ दिवस जेवण न करता गंगाजळ फक्त दोन वेळा तसेच (मौन व्रत) कोणाशी न बोलता साई चरित्राचे अध्ययन, गीता, गायीत्री जप, ॐ कुंड ह्या प्रकारे करीन. याप्रमाणे २० आक्टोबर ते २० नव्हेम्बर पर्यंत ३१ दिवस मी आपल्या मनातील हेतू पूर्ण केला. तसेच नव्हेम्बर २० ता. दिवशी व्रत सोडले. माझ्या आईच्या हातून दूध व मध मिश्रण घेतले. माझी प्रकृती बिघडली होती, शरीर फार अशक्त झाले होते. माझे शरीरात अशक्तपणा आला होता. जेवण घेतले तर अपचन होत होते. दिवसातून ७–८ वेळा तरी शौचास जावे लागत होते. पोटात एक छटाक पण अन्न जाणे कठीण होते. मी फक्त पाणी व दूध मिसळून थोडे थोडे करून पीत होतो, तरी शरीर काही सुधारेनासे झाले. मनात विचार झाला की जो पर्यंत शिर्डीत जाऊन बाबांचे दर्शन करणे नाही तो पर्यंत हे शरीर सुधारणार नाही.

शेवटी डिसेंबर ७५ च्या तिसऱ्या आठवड्यात मी शिर्डीस सौ. व इतर ४ मित्रांना घेऊन निघालो. निघण्यापूर्वी एक मित्र सत्यनारायण एक महिन्यापासून

फारच आजारी होता व त्याचे येणे कठीण होते, तो म्हणत होता की, बाबांची आज्ञा झाली तरच येईन. शेवटी निघाला. जस-जसे तो गाडीत बसून शिर्डीकडे निघाला तस-तशी त्याची प्रकृती सुधारत गेली. शिर्डी येईपर्यंत त्याचा आजार, अशक्तपणा फारच कमी झाला.

माझ्या बरोबरचे आलेले मित्रगण तीन दिवसानंतर हैद्राबादला गेले. जाण्यापूर्वी एक रात्र शांती निवासाच्या व्हरांड्यात त्यांना काढावी लागली. कारण नाताळचा आठवडा होता त्यामुळे मुंबई पुणे कडील गर्दी फार होती. नंतर दुसऱ्या दिवशी मंदिराच्या वरील खोली नं ५ देण्यात आली. आम्ही तेथे थांबलो. मी तेथे गेल्यानंतर साई हॉस्पिटल-मध्ये औषधाकरिता गेलो. तेथे फक्त ४ आणे देऊन औषध घेतले. एक वेळा औषध घेतले नि माझी अर्धी प्रकृती सुधारली व जेवण्यात वाढ झाली. तीन दिवस औषध घेतले प्रकृतीत फारच सुधारणा झाली.

शिर्डी मध्ये पंधरा दिवस रहावे, अशी इच्छा, पण येथे तसे रहाता येत नाही. कारण गर्दी फार होती. काय करावे या विचारात होतो, इतक्यात माझ्या मुलाची प्रकृती बिघडली. मुलगा साईनाथ साईप्रसाद तोंडावर आईचे व्रण (गोवर) दिसू लागले. मी ऑफिसमध्ये सूचना दिली की माझे जाणे होत नाही कारण की, माझा मुलगा आजारी आहे तेव्हा मला रहाण्याची परवानगी मिळाली. अशा प्रकारे पंधरा दिवस राहिलो. माझी व मुलाची प्रकृती एकदम सुधारली.

माझा पुढील कार्यक्रम असा होता की, अहमदनगर तालुक्यातील खेडे गंगापूर गावी एक महिना काढावा. तेथे प्रकृती सुधारल्यानंतर हैद्राबादला जावे. ह्या इच्छेने परळी कडे निघालो. तेथे चारपाच मित्रांच्या साह्यतेने भेटी-गाठी केल्या. शिल्लक त्या भेटीत जे काही रुपये जवळ होते ते संपले. फक्त २५ रु. राहिले. आम्हा दोघाना गाडी भाडे २१ रु. होते. पुढे काय करावे हा विचार पडला. मित्राकडून घेऊ नये हा माझा मनातील उद्देश होता. मी विळेगावाहून परत एका गावी खेड्यास देवदर्शनार्थ मित्राच्या भेटीस आलो. घरी येऊन टेकलो एवढ्यात वर्तमान मिळाले की हैदराबाद-हून ५५-०० रुपयाची मनी ऑर्डर माझ्या नावावर आली आहे. मी विचारात पडलो की मी कोणास पत्र पाठवले नाही की पैसे पाठवा. कोणी पाठवले असतील हा विचार निर्माण झाला. मी त्वरित एका मुलास पोस्टमनला बोलावण्यास सांगितले त्याने आल्या बरोबर सांगितले की ही मनी ऑर्डर भद्राचलमहून हैद्राबादला आली. तेथून पत्ता येथला दिल्यामुळे ही मनी ऑर्डर येथे आली आहे. पाठवणार आर. के. रेड्डी एवढे सांगितल्या वरून कळले की हे घरचे भाडे आहे. भाडेकरूने हैदराबाद मध्ये घरी साडू शंकरराव होते, त्यांना मी सांगून पण आलो नव्हतो की पैसे इकडे पाठवा, किती विचित्र गोष्ट. म. ऑ. पाठवणार मार्गदर्शन करणार बाबाच आहेत. त्यांनी माझी चिंता दूर केली.

अशा प्रकारे मला कोणाकडूनही रु. न मागवता हैदराबादला येणे झाले. जेव्हा जेव्हा मी जशी भावना मनात आणतो तसे-तसे बाबा माझी विनंती मान्य करतात, हा माझा प्रत्यक्ष अनुभव आहे. कोणत्या प्रकारे माझी प्रकृतीची सुधारणा केली; कसे पैशाच्या विवंचनेतून माझी शिर्डीत पंधरा दिवस राहण्याची सोय केली, कसे माझे व्रत ३१ दिवसांचे पूर्ण केले ! खरोखरच ही नवलाची गोष्ट नव्हे काय ?

खरोखरच बाबा शिर्डीत अदृश्य असून सुद्धा सर्व भक्तांना आशीर्वाद देतात तसेच त्यांचे मनातील हेतू पूर्ण करतात. म्हणून म्हणतो जयाची जैसी भावना फळ तैसा जाणा ।

# — श्री साईकृपा —

—सुनिलदत्त सांडभोर
५७० दत्तवाडी, पुणे ३०.

* माझे नाव सुनिल, वय १५ वर्षे. माझे आईचे नाव सौ. कमल. वडिलांचे नाव रघुनाथ सांडभोर.

प्रथम पासूनच प्रतिवर्षी मी आई वडिलांचे बरोबर शिर्डीस जात असतो. परंतु या वर्षी मला जाता येईल असे वाटत नव्हते. कारण माझी शाळेची परीक्षा त्याच वेळी होती. शिवाय वडीलही खर्चाचे अडचणीमुळे मला घेऊन जाण्यास तयार नव्हते.

मी अगदीच नाराज झालो होतो. या वर्षी बाबांचे दर्शन होणार नाही म्हणून वाईट वाटत होते. मी सारखा बाबांचा धावा करत होतो की मला आपले दर्शनास येऊ द्या.

शेवटी साई कृपेने अचानक आमची परीक्षा पुढे ढकलली गेल्याचे कळले. एक अडचण दूर झाली. आता सारखा बाबांचा धावा की, मला बरोबर नेण्याची बुद्धी वडिलांना दे.

शिर्डीस जाण्याचा दिवस आला. आवरा आवरी करून वडील निघाले. मी परत त्यांना मला बरोबर घेण्याबद्दल विनवले. शेवटी वडील चल म्हणाले. मीही घाईने माझी तयारी करून त्यांचेसह स्टँडवर आलो. पहातो तर आम्हाला उशीर झाल्यामुळे आमची गाडी निघून गेली होती. परत माझी प्रार्थना सुरू झाली. बाबा आता माझा अंत पाहू नका, मला आपले दर्शनास येऊ द्या. शेवटी थोड्या वेळाने कशीतरी दुसरी गाडी आम्हास मिळाली व आम्ही शिर्डीस पोहोचलो.

उतरल्याबरोबर दर्शनास गेलो. इतर सर्व कार्यक्रम व्यवस्थित झाले. मनाला खूप समाधान वाटले. रात्री मिरवणुकीनंतर गायनाचे कार्यक्रम होतात. मलाही वाटले की, आपण एखादे गीत म्हणावे, पण वडील मला जमणार नाही म्हणून नको म्हणत होते. मी बाबांची प्रार्थना केली की, मला आपली सेवा करण्याची संधी द्यावी. शेवटी वडील तयार झाले व माझे नाव गाणे म्हणण्यासाठी दिले. परंतु दीड-दोन वाजले तरी माझा नंबर येण्याचे चिन्ह दिसेना व मला झोपही येऊ लागली होती. म्हणून समाधी मंदिरात फेऱ्या घालत बसलो. थोड्या वेळाने परत आलो तर शास्त्रीबुवा मला म्हणाले. तुझा नंबर शेवटी आहे. त्यामुळे मी फारच नाराज झालो. तेवढ्यात वडीलांचे एका मित्राने शास्त्री बुवांना सांगुन माझा नंबर लावला. मी एक पद म्हटले. सुदैवाने पेटी-तबल्याची साथ चांगली मिळाली, त्यामुळे काही त्रास झाला नाही. शास्त्री बुवांनी नारळ व एक रुपया दिला. मी समाधी मंदिरात जाऊन बाबांचे दर्शन घेतले. बाबांच्या सेवेची ही चांगली संधी मला मिळाली. ही बाबांचीच कृपा होय असे मी समजतो.

मी रोज घरी बाबांचे दर्शन घेऊन उदी लावल्याशिवाय कोठे बाहेर जात नाही. श्री साई कृपेने आजपर्यंत आलेल्या संकटातून–अडचणीतून निश्चित मार्ग सापडतो. बाबांची सेवा करण्याची संधी वरचेवर मिळो हीच साईचरणी नम्र विनंती.

# केवळ नामस्मरणाने !

—श्री. शांताराम गोविंद कदम
आंबेडकर रोड, भायखळा

मी नेहमी बाबांचे नामस्मरण करतो.

एक गोष्ट सांगण्यासारखी असल्यामुळे बाबांच्या प्रिय भक्ताच्या अनुभवातिलच आहे. माझ्या गावी आईला मिळालेल्या बक्षीस इस्टेटीची भानगड निर्माण झाली आणि कोर्टात जाण्याची वेळ आमच्यावर आली. परंतु मी प्रथम माझ्या नोकरीचा उल्लेख केल्याप्रमाणे मला दरमहा पगार १० रुपये होता. त्यामुळे आम्ही आमची फिर्याद करण्याकरिता वकील करण्याच्या ऐपतीत नव्हतो. आणि कसेही करून कागदपत्र दाखवयास पाहिजेच होते. मी सारखा विचार करून पाहिला पण मार्ग सापडेना. तेव्हा नेहमी प्रमाणे श्रीबाबांचे नामस्मरण मनात करून त्यांना विनविले. हे प्रभो श्रीसाईबाबा मला या संकटातून कसे मोकळे करणार! एव्हढा विचार करतो न करतो तोच माझ्या गावचे गृहस्थ माझ्यापुढे दस म्हणून उभे राहिले. आणि त्यानी एक चिठ्ठी माझ्या